Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education, Kolhapur Divisional Board, Kolhapur-416004
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, ५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.
दुरध्वनी क्र - (०२३१) २६९६१०१ / २ / ३ Website - www.sscboardkolhapur.in Email - divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/डीपी/का.मा./२०२२-२३/1559
दिनांक :- 04 SEP 2023

**प्रति,**
**मुख्याध्यापक/प्राचार्य,**
**सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालय/**
**व्यवसाय अभ्यासक्रम(MCVC)/औद्योगिक प्रशिक्षण संस्था(ITI),**
**सातारा/सांगली/कोल्हापूर.**

विषय: जुन्या व नवीन शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना प्रथम मान्यता देणे,मान्यता वर्धित करणे व कायम मान्यता देणेबाबत.....

**सदर्भ: १)क्र.रा.मं./परीक्षा-३/१६६९ दि.२०/०४/२०२३ चे पत्र**
**२)या विभागीय मंडळाचे पत्र क्र.कोविमं/डीपी/का.मा./२०२२/२३/३८२/दि.२३/०५/२३ चे पत्र**
**३) क्र.रा.मं./परीक्षा-३/३७२९,दि.२५.०८.२०२३ चे पत्र**

उपरोक्त संदर्भिय विषयांस अनुसरुन सर्व शाळा/क.महाविद्यालयांना कळविणेत येते की,जुन्या व नविन शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना प्रथम मान्यता देणे,मान्यता वर्धित करणे व सांकेतांक क्रमांकास कायम मान्यता देणे,यासाठी धोरण निश्चित करणेसाठी दि.०६/०१/२०२३ च्या कार्यकारी परिषदेमध्ये दोन मुद्दे तयार केले होते.त्याबाबतचे संदर्भ क्र.२ च्या परिपत्रकांन्वये सर्वांना मंडळाच्या अधिकृत वेबसाईटवर अवगत करण्यात आलेले आहे. परंतू सदर परिपत्रकामध्ये इ.१२ एम.सी.व्ही.सी कनिष्ठ महाविद्यालयाना प्रथम मान्यता,मान्यता वर्धित व सांकेतांक क्रमांकास कायम मान्यता करणेबाबतच्या कार्यवाहीचा तथा धोरणाचा उल्लेख नसल्याने उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. ०३ अन्वये राज्य मंडळाने कळविल्यानुसार उच्च माध्यमिक (इ.१२वी) व्यवसाय अभ्यासक्रम (MCVC) कनिष्ठ महाविद्यालयांना मान्यता देणेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करणेबाबत कळविण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशील | मान्यता वर्धित करणे/कायम मान्यता देणेबाबत कार्यवाही |
|---|---|---|
| १. | नव्याने मान्यता मिळालेल्या व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांचे कार्यालय तसेच सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,यांची प्रथम मान्यता व कायम मान्यतेसाठी शिफारस असलेल्या तसेच कायम मान्यतेसाठी शिफारस नसलेली क.महाविद्यालये | व्यवसाय अभ्यासक्रम (MCVC) कनिष्ठ महाविद्यालयांना जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय तसेच सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालयाची शिफारस असल्यानंतर कनिष्ठ महाविद्यालयास मंडळ मान्यता व सांकेतांक क्रमांक देतांना पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.<br>अ) (i) इंग्रजी माध्यम कनिष्ठ महाविद्यालयासाठी रु.१२,०००/-<br>(ii) इतर सर्व माध्यमांच्या कनिष्ठ महाविद्यालयासाठी रु.१०००/- प्रमाणे शुल्क आकारुन मंडळ मान्यता व सांकेतिक क्रमांक द्यावा. |

| अ. क्र. | तपशील | मान्यता वर्धित करणे/कायम मान्यता देणेबाबत कार्यवाही |
|---|---|---|
| | | ब) तदनंतर सलग ५ वर्ष मान्यता वर्धित करुन प्रति वर्ष रु.१०००/- प्रमाणे शुल्क आकारावे. |
| | | क) १) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय तसेच सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालयाची प्रथम मान्यता व कायम मान्यतेसाठी शिफारस असलेल्या व मंडळ नियमावलीतील सर्व अटी शर्तीची पूर्तता होत असल्यास पुढील वर्षी कायम मान्यता द्यावी व त्यासाठी रु.५०००/-शुल्क आकारण्यात यावे.<br>२) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय तसेच सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालयाची प्रथम मान्यतेसाठी शिफारस असलेल्या तथापि कायम मान्यतेसाठी शिफारस नसलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांना जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय तसेच सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालयाची प्रथम मान्यता जो पर्यंत सुरु आहे तो पर्यंत (मान्यता काढून घेईपर्यंत) अशा कनिष्ठ महाविद्यालयांना मंडळ नियमावलीतील सर्व अटी शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून कायम मान्यता देण्यात यावी व त्यासाठी एकवट रु.१५०००/- शुल्क आकारण्यात यावे. |
| २) | मागील ६(सहा) वर्षापूर्वी व मागील ६ (सहा) वर्षात मान्यता मिळालेल्या व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांचे कार्यालय तसेच सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,यांची प्रथम मान्यता व कायम मान्यतेसाठी शिफारस असलेल्या तसेच कायम मान्यतेसाठी शिफारस नसलेली कनिष्ठ महाविद्यालये | अ) (i) इंग्रजी माध्यम कनिष्ठ महाविद्यालयासाठी रु.१२०००/-<br>(ii) इतर सर्व माध्यमांच्या कनिष्ठ महाविद्यालयासाठी प्रत्येकी रु.१०००/- प्रमाणे शुल्क आकारुन मंडळ मान्यता व सांकेतिक क्रमांक घेतला असल्याने याबाबत पुन्हा कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.<br><br>ब) तद्नंतर सलग ५ वर्ष मान्यता वर्धित करुन प्रति वर्ष रु.१०००/- प्रमाणे शुल्क आकारावे.मात्र सदर पाच वर्षापैकी काही वर्षाची मान्यता वर्धित करुन प्रती वर्ष रु.१०००/- प्रमाणे शुल्क आकारले असल्यास तेवढी रक्कम रु.५०००/- मधून वजावट करुन उर्वरित शुल्क आकारावे व प्रलंबित वर्षाची मान्यता वर्धित करावी.<br><br>क) १) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय तसेच सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालयाची प्रथम मान्यता व कायम मान्यतेसाठी शिफारस असलेल्या व मंडळ नियमावलीतील सर्व अटी शर्तीची पूर्तता होत असल्यास पुढील वर्षी कायम मान्यता द्यावी व त्यासाठी रु.५०००/-शुल्क आकारण्यात यावे.<br>२) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय तसेच सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालयाची प्रथम मान्यतेसाठी शिफारस असलेल्या तथापि कायम मान्यतेसाठी शिफारस नसलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांना जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय तसेच सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयाची प्रथम मान्यता जो पर्यंत सुरु आहे तो पर्यंत (मान्यता काढून घेईपर्यंत) अशा कनिष्ठ महाविद्यालयांना मंडळ नियमावलीतील सर्व अटी शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून कायम मान्यता देण्यात यावी व त्यासाठी एकवट रु.१५०००/- शुल्क आकारण्यात यावे. |

ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालय पहिल्या सहा वर्षानंतर (१+५ वर्ष) कायम मंडळ मान्यता घेण्यासाठी विभागीय मंडळाकडे प्रस्ताव पाठविणार नाहीत अशा शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडून मान्यता वर्धित शुल्क रु.१०००/-ऐवजी रु.२०००/- शुल्क आकारणेत येईल.तरी अद्याप ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी मंडळाकडून मान्यता वर्धित करुन घेतलेली नाही अशा सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यलयांनी त्वरीत मंडळाकडे सर्व शिफारशीसह प्रस्ताव सादर करून मान्यता वर्धित तथा सांकेतांक क्रमांक नुतनीकरण करुन घेण्याची कार्यवाही तातडीन करावी.

**(डी.एस.पोवार)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.**

**प्रत माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीस्तव**

१) मा.शिक्षण उपसंचालक,कोल्हापूर विभाग,कोल्हापूर.
२) मा.शिक्षणाधिकारी (माध्य.) सातारा,सांगली व कोल्हापूर
३) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी ,सातारा,सांगली व कोल्हापूर
४) मा.सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,घोले रोड,पुणे.

**यांना देवून कळविण्यात येते की, उपरोक्तप्रमाणे पत्रामध्ये नमूद केल्यानुसार प्रथम मान्यता,मान्यता वर्धित व सांकेतांक क्रमांकास कायम मान्यता देणेबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले असून त्यानुसार योग्य ती शिफारस करुन सदरचे प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करण्यात यावेत.**